ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २१ ❑ अंक २२० वा ❑ भारतीय सौर दिनांक ०४ कार्तिक शके १९४८, मंगळवार दि.२७ ऑक्टोंबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्रत्येक वेळी नव्याने नोंदणी का करावी लागते?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्रत्येक वेळी पूर्णपणे नवीन मतदार यादी तयार केली जाते. लोकसभेसारखी किंवा विधानसभेसारखी जुनीच मतदार यादी पुढे सुरू न ठेवता, ती पूर्णपणे रद्द करून दरवेळी नवीन नाव नोंदणी (–१८ भरून) करून घेतली जाते.

जर तुम्ही मागील पदवीधर निवडणुकीत मतदान केले असेल, तरीही तुम्हाला नवीन निवडणुकीसाठी पुन्हा फॉर्म नंबर १८ भरून ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने नाव नोंदवणे सक्तीचे असते.

मतदार नोंदणी नियम, १९६० मधील नियम ३१ (३) नुसार, पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाची मतदार यादी प्रत्येक निवडणुकीपूर्वी नव्याने तयार करणे कायद्याने आवश्यक आहे. निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार जुनी यादी बाद ठरवली जाते आणि प्रत्येक पात्र व्यक्तीला पुन्हा नव्याने अर्ज करावा लागतो.

या निवडणुकीत मतदान करण्यासाठी व्यक्ती केवळ पदवीधर असणे पुरेसे नाही, तर निवडणुकीच्या वर्षातील १ नोव्हेंबरपूर्वी (अर्हता दिनांक) त्या व्यक्तीला पदवी मिळून किमान ३ वर्षे पूर्ण झालेली असावीत हा मुख्य नियम आहे. दर ६ वर्षांनी होणाऱ्या या निवडणुकीत हजारो नवीन तरुण या ३ वर्षांच्या अटीची पूर्तता करून पात्र ठरतात, तर जुन्या यादीतील अनेक मतदारांच्या स्थितीत बदल झालेला असतो.

पदवीधर नागरिक नोकरी, व्यवसाय, उच्च शिक्षण किंवा विवाहामुळे सतत आपले शहर, जिल्हा किंवा राज्य बदलत असतात. विधान परिषदेच्या या निवडणुकीत मतदार हा त्या संबंधित मतदारसंघाचा सर्वसाधारण रहिवासी असणे कायद्याने बंधनकारक आहे. जुनीच यादी कायम ठेवल्यास चुकीच्या पत्त्यावर किंवा मतदार मतदारसंघात नसतानाही मतदान होण्याचा धोका वाढतो.

६ वर्षांच्या मोठ्या कालावधीत अनेक मतदारांचा मृत्यू झालेला असू शकतो किंवा काही कारणांमुळे ते अपात्र ठरलेले असू शकतात. लोकसभा/विधानसभेप्रमाणे यासाठी घरोघरी जाऊन तपासणी करणे प्रशासनासाठी कठीण असते, कारण पदवीधर मतदार विशिष्ट भौगोलिक रचनेत विखुरलेले असतात. त्यामुळे नवीन यादी तयार केल्याने मृत किंवा स्थलांतरित व्यक्तींची नावे आपोआप यादीतून बाहेर पडतात.

काहीवेळा पदवीधर एकापेक्षा जास्त पदव्या घेतात किंवा वेगवेगळ्या ठिकाणी त्यांचे नाव नोंदवले जाण्याची शक्यता असते. यादी शंभर टक्के अचूक आणि पारदर्शक ठेवण्यासाठी निवडणूक आयोग प्रत्येक वेळी सर्व कागदपत्रांची (पदवी प्रमाणपत्र आणि रहिवासी पुरावा) नव्याने पडताळणी करते.

साताऱ्यात ज्योतिर्मय दीपावली २०२६ अंकाचा प्रकाशन सोहळा थाटात संपन्न

पालकांनी आपल्या पाल्यांना टीव्ही/मोबाईलपेक्षा पुस्तकांच्या व वाचनाच्या विश्वाकडे वळवावे – शिरीश चिटणीस

साहित्याची ज्योत समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचवणे हेच उद्दिष्ट – संजय व्यापारी

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

सातारा – कोजागिरी पौर्णिमेच्या मंगल पर्वावर दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सातारा व ज्योतिर्मय प्रकाशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ज्योतिर्मय दीपावली २०२६ या दिवाळी अंकाचा प्रकाशन सोहळा दीपलक्ष्मी सांस्कृतिक हॉल, शनिवार पेठ, सातारा येथे रविवार दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मोठ्या उत्साहात पार पडला.

दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक व चेअरमन तथा ज्येष्ठ साहित्यिक शिरीष चिटणीस यांच्या शुभहस्ते अंकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी नवोदित कवी व लेखकांचा सत्कार ज्योतिर्मयचे संपादक संजय व्यापारी यांच्या हस्ते करण्यात आला.

ज्योतिर्मय दिवाळी २०२६ अंकात साताऱ्याच्या साहित्यिक ॲड. शुभदा कुलकर्णी, वैशाली महाडिक, रंजना सानप, स्नेहल यादव, सुरेखा शेजवळ, रूपाली गुरव, विजया देशपांडे तसेच प्रदीप केळुस्कर यांच्या साहित्याचा समावेश आहे. या कार्यक्रमास भावी लेखक म्हणून विद्यार्थी – विद्यार्थिनी आणि सातारा परिसरातील लेखिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी बँक ऑफ महाराष्ट्रचे श्रीराम नानल, सुहास पुराणिक, अंजली चिटणीस, निल चिटणीस, शुभम व्यापारी, प्राचार्य राजेंद्र शेजवळ आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रकाशन सोहळ्यात बोलताना संजय व्यापारी म्हणाले, ''दिवाळी अंक ही केवळ पानांची पुस्तिका नसून मराठी भाषा, संस्कृती व विचारांची परंपरा पुढे नेणारी सामाजिक चळवळ आहे. दिवाळीत फराळासोबतच वाचनाची आणि विचारांची समृद्धी मिळणे गरजेचे आहे. ज्योतिर्मय हे साहित्याला वाहिलेले दैनिक असून, नवोदित लेखक आणि कवींना कोणत्याही प्रसिद्धीच्या अपेक्षेविना आपले विचार मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते.''



''साहित्याची ज्योत समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचवणे हेच उद्दिष्ट असून, ज्योतिर्मयच्या माध्यमातून नवोदित साहित्यिकांना विनामूल्य व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. दिवाळी अंक ही केवळ पानांची पुस्तिका नसून मराठी भाषा, संस्कृती व विचारांची परंपरा पुढे नेणारी सामाजिक चळवळ आहे.''

– संजय व्यापारी,
संपादक,
ज्योतिर्मय, पुणे

''साहित्यिक नवोदित आहे की प्रस्थापित, यापेक्षा त्याच्या लेखनातील आशय आणि प्रभावी अभिव्यक्ती अधिक महत्त्वाची असते. ज्येष्ठ आणि नवोदित साहित्यिकांमध्ये संवाद घडल्यासच मराठी साहित्य अधिक समृद्ध होईल,'' असेही ते म्हणाले.

ज्योतिर्मय दैनिकाचे वेगळेपण अधोरेखित करताना संजय व्यापारी म्हणाले, ''या वर्तमानपत्रात राजकारण, गुन्हेगारी किंवा अपघातांच्या बातम्यांना स्थान नसून, केवळ साहित्य, कला आणि संस्कृती या तीनच विषयांना वाहिलेले हे व्यासपीठ आहे. बातमी किंवा लेख प्रसिद्ध करण्यासाठी कोणतेही पैसे लागत नाहीत; पैशांची मागणी करणे चुकीचे असून ज्योतिर्मयद्वारे साहित्याची सेवा विनामूल्य केली जाते.''

विद्यार्थी व तरुण पिढीला आवाहन करताना ते म्हणाले, ''शाळांमधील विविध उपक्रम, थोर पुरुषांच्या जयंती व उत्सवांवर विद्यार्थ्यांनी निबंध, लेख किंवा कविता न घाबरता लिहाव्यात. विद्यार्थ्यांचे लेख दुरुस्त करून (एडिट करून) त्यांच्या नावांसह व फोटोसह मोफत प्रसिद्ध केले जातील.''

''सातारा ही केवळ ऐतिहासिक भूमी नसून वैचारिक परंपरा आणि वाचनाची आवड जपणारी साहित्यिक नगरी आहे. दीपलक्ष्मी पतसंस्थेने आर्थिक व्यवहारांसोबतच साहित्य व संस्कृतीला दिलेले प्रोत्साहन कौतुकास्पद व सामाजिक जाणीव जपणारे आहे,'' असेही व्यापारी यांनी नमूद केले.

शिरीष चिटणीस यांनी आपल्या भाषणात पुस्तके मानवी जीवन कसे घडवतात आणि वाचनाची प्रक्रिया किती महत्त्वाची आहे, हे अधोरेखित केले. जगभरात ६३ भाषांमध्ये भाषांतरित झालेल्या व कोट्यवधी प्रती खपलेल्या द बुक थिफ या पुस्तकाची कथा सांगून, हुकूमशाही किंवा कठीण काळातही पुस्तकांनी मानवी मूल्ये कशी जिवंत ठेवली, याचे प्रभावी उदाहरण त्यांनी दिले.

मराठी भाषेला लाभलेल्या वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर), विं. दा. करंदीकर आणि भालचंद्र नेमाडे या चार ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिकांचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. कवी बा. भ. बोरकर यांची 'प्रतिभा' या काव्यसंग्रहातील कविता वाचून ती वि. स. खांडेकरांनी त्यांचे कौतुक करीत त्यांना अजून कसदार लिखाण करण्यासाठी त्यांच्याशी शिरोड्याला बोलावून चर्चा केल्या आणि वाचन करण्याचा दिलेला महत्त्वाचा सल्ला त्यांनी श्रोत्यांना सांगितला.

पालकांनी आपल्या पाल्यांना टीव्ही/मोबाईलपेक्षा पुस्तकांच्या व वाचनाच्या विश्वाकडे वळवावे, असे आवाहन करण्यात आले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना लिखाणासाठी सतत प्रोत्साहन देऊन नवीन लेखक घडवण्यास मदत करावी, असेही सांगण्यात आले. संजय व्यापारी हे स्वतःचा खर्च करून नवोदित व विद्यार्थी लेखकांच्या कविता व लेख कोणत्याही शुल्काशिवाय प्रसिद्ध करतात, याचेही कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमास कल्याणी शिंदे, सौ. करंबेळकर, सौ. खंडाईत, बाळकृष्ण इंगळे, शुभम बल्लाळ, हणमंत खुडे, जगदीश खंडागळे, विजय गव्हाळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सुरेखा शेजवळ यांनी केले, तर आभार रूपाली गुरव यांनी मानले. यावेळी तबला व पेटीच्या तालावर रमेश महामुलकर व श्रीनाथ सावंत यांनी स्वागत गीत सादर केले.

यावेळी सत्कार करण्यात आलेले नवोदित कवी व विद्यार्थी – सौ. कल्याणी ओंकार शिंदे (प्रकाशित कवितासंग्रह अथांग), कु. श्रेया तानाजी काळे, कु. भाग्यश्री निलेश चौधरी, साई रविंद्र शिंदे, केतन शिवाजी सुतार, आर्यन राजू साळुंखे, अमृता रामचंद्र जाधव, सानिका सखाराम शेलार, समृद्धी राजेश शेवते, सायली दीपक देवरुखे, दर्शना पांडुरंग माने, कृतिका चंद्रकांत शिर्के, मनीषा मारुती मोहिते, नेहा युवराज माने, अजित चव्हाण, सानिका तुकाराम सकपाळ, अनुष्का विकास खांडेकर, दिशा लक्ष्मण सकपाळ, दर्शना भीमराव कदम, स्वरा मदन पाटोळे, अन्वी अमोल मोरे, समृद्धी अतुल डोंगरे, खुशी इरफान बागवान, संस्कृती रुपेश सरकाळे, मानसी महेश शिंदे, मानवी जगदीश बळे, जान्हवी पृथ्वीराज साळुंखे, आराध्या संभाजी पाटील

दक्षिण भारतातील मराठ्यांच्या कर्तुत्वामुळे बौद्धिक व सांस्कृतिक उत्कर्ष

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

'पुणे पुस्तक जत्रा' या ७ ते ११ ऑक्टोंबर २०२६ रोजी संपन्न झालेल्या पुणे येथील उत्सवात १५ वेगवेगळ्या विषयांवर कार्यक्रम आम्ही घेतले होते. पुस्तक विक्रीबरोबर साहित्यिक,सांस्कृतिक आणि वैचारिक मेजवानी कार्यक्रमासह पुणेकर रसिकांसाठी या निमित्ताने या महोत्सवात संपन्न झाले. यामध्ये 'मराठ्यांचे दक्षिण भारतातील कर्तृत्व' या विषयावरची चर्चा प्रचंड गाजली. या चर्चेमध्ये डॉ सदानंद मोरे, पांडुरंग बलकवडे,विक्रमसिंह मोहिते आणि कर्नाटकातील आमदार डॉ मारुतराव मुळे सहभागी होते.

या चर्चेत डॉ मारुतराव मुळे म्हणाले,१६३८ मध्ये आदिलशाहीच्या काळात शहाजीराजांनी बेंगलोरची जहागिरी मिळवली व तेथे राहून स्थानिक लोकांशी समन्वय साधत एक आदर्श, शांततापिय व लोककल्याणकारी राज्य चालवले. उत्तर भारतात परकीय आक्रमणांमुळे प्राचीन मंदिरे व संस्कृती उध्वस्त झाली; परंतु शहाजीराजांच्या दक्षिणेतील वास्तव्यामुळे व संरक्षणामुळे दक्षिण भारतातील प्राचीन हिंदू मंदिरे सुरक्षित राहिली.व्यंकोजी राजे आणि तंजावरच्या मराठा राजांनी दक्षिणेत कला, साहित्य व संस्कृतीला राजाश्रय दिला. सरस्वती महाल वाचनालयात मराठी, तमिळ, संस्कृतसह परदेशी भाषांतील दुर्मिळ ग्रंथांचे जतन केले गेले. भरतनाट्यम या नृत्यकलेला थेट राजाश्रय देऊन समृद्ध करण्यात आले. तसेच धन्वंतरी महालद्वारे वैद्यकीय व आरोग्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले गेले. छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिण दिग्विजयाद्वारे दक्षिणेत प्रवेश करून स्थानिकांशी कौटुंबिक व सांस्कृतिक ऋणानुबंध जोडले. छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर राजाराम महाराजांना कर्नाटकातील केळदीच्या राणीने आश्रय दिला आणि जिंजीच्या किल्ल्यातून मराठ्यांनी तब्बल ९ वर्षे मुघलांविरुद्ध अभूतपूर्व लढा दिला. घोरपडे, पटवर्धन आदी मराठा सरदारांनी कर्नाटकात मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा पाया रचला आणि अनेक शिक्षणसंस्था उभारल्या, असे सर्व डॉ. मुळे यांनी विशद केले.

दक्षिण भारतातील मराठ्यांचे कर्तृत्व यावर अधिक संशोधनाची गरज असल्याचे या विषयावरील चर्चेत जाणवले.छत्रपती शिवाजी महाराजांचे सावत्रभाऊ व्यंकोजी भोसले यांनी १६७४७५ साली तंजावरचे नायक राज्य संपुष्टात आणून तिथे भोसले घराण्याचे स्वतंत्र राज्य स्थापन केले. हे राज्य १८५५ पर्यंत, म्हणजे सुमारे एकशे ऐंशी वर्षे टिकले. उत्तरेकडील महाराष्ट्रात मराठ्यांना मुघल सत्तेशी दीर्घ आणि अतिशय कठीण संघर्ष करावा लागला.औरंगजेबाच्या दीर्घ दक्षिण मोहिमांमुळे महाराष्ट्रात युद्ध, ताणतणाव, लूट आणि राजकीय अस्थिरता वाढली. त्याउलट तंजावरच्या कावेरी खोऱ्यातील भोसले राज्याला अशा तीव्र टक्करीचा सामना तेवढ्या प्रमाणात करावा लागला नाही. त्यामुळे तिथे राजकारणाइतकेच नव्हे, तर देवालये, संगीत, नृत्य, चित्रकला, साहित्य, ग्रंथसंपदा आणि विद्वत्ता यांची अनुकूल परंपरा वाढली. तंजावरचे भोसले हे केवळ राजकारणी नव्हते; ते दक्षिण भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागृतिचे महत्त्वाचे संरक्षक ठरले.

व्यंकोजी भोसले हे शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे यांचे पुत्र होते. शहाजी राजे यांचा दक्षिणेतील प्रभाव, बंगळूर–कान्हवर येथील जहागीर आणि तमिळ राज्याशी असलेला संबंध यामुळे भोसले घराण्याचा पाया दक्षिणेत आधीच रुजला होता. व्यंकोजींनी १६७४ साली तंजावरवर विजय मिळवला आणि १६७५ पासून त्यांनी स्वतंत्र राज्यकारभार सुरू केला. त्यांनी तंजावरला भोसले सत्तेचे केंद्र बनवले आणि तिथे मराठी प्रशासन, तमिळ समाज, तेलुगू संस्कृती व तमिळ ब्राह्मण परंपरा यांचा सुंदर संगम घडवला.व्यंकोजींनी केवळ राज्य स्थापन केले नाही, तर तिथे धार्मिक व सांस्कृतिक वातावरणही जोपासले. त्यांनी देवालयांना दाने दिली, मंदिरांची देखभाल केली आणि स्थानिक परंपरांना आदर दाखवला. तंजावरमधील भोसले राजे यांनी चोलकालीन प्रसिद्ध बृहदीश्वर मंदिरासह अनेक मंदिरांची जीर्णोद्धारे व सजावट केली.तसेच नवीन देवालयेही बांधली. ही धार्मिक उदारता हीच तंजावरच्या सांस्कृतिक वाढीची पहिली पायरी ठरली.

औरंगजेबाने १६८० च्या दशकापासून दक्षिणेवर मोठी मोहीम सुरू केली. त्याचे लक्ष विशेषतः मराठा सत्ता, मराठा किल्ले आणि दक्षिणेतील विरोधी शक्ती यांवर होते. महाराष्ट्रात संभाजी महाराजांचा छळ, रायगडचे पतन, येसूबाई व शाहू यांचे



बंदीपण, किल्ल्यांची वारंवारता बदलणारी स्थिती आणि दीर्घकाळ चाललेले युद्ध यांमुळे समाजजीवन अत्यंत तणावग्रस्त झाले. मुघल सैन्याची चाल, कारभार लुटालूट आणि राजकीय अस्थिरता यांचा परिणाम गावोगावी जाणवला.तंजावरच्या भोसल्यांनाही मुघलांचा दबाव, कर्नाटकातील राजकीय उलथापालथ आणि नंतर ब्रिटिश विस्ताराचा प्रश्न टाळता आला नाही. पण महाराष्ट्राप्रमाणे तिथे सततचे युद्धक्षेत्र निर्माण झाले नाही. कावेरी नदीच्या सुपीक खोऱ्यात शेती, व्यापार, मंदिरे आणि कलावंत समृद्ध होऊ शकले. राज्याची स्थिरता हीच कला व विद्वत्तेसाठी अनुकूल भूमी ठरली.तंजावरच्या भोसल्यांचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे देवालयांचे संरक्षण व पुनरुज्जीवन. त्यांनी शैव, वैष्णव, देवी आणि स्थानिक लोकदैवतांच्या परंपरांना संरक्षण दिले. बृहदीश्वर मंदिराची देखभाल, मंदिरांमधील उत्सव, यात्रा, अभिषेक, संगीतसेवा आणि धार्मिक विधी यांना राजाश्रय मिळाला. मंदिरे केवळ पूजास्थाने राहिली नाहीत; ती शिक्षण, संगीत, नृत्य, शिल्प आणि समाजजीवनाची केंद्रे बनली.मंदिरांच्या आसपास वाद्यवादक, गायक, नर्तक, शिल्पकार, वेदपाठी, पुराणिक आणि विद्वान यांचे वर्ग वाढले. देवालयांमधील नित्य, नैमित्तिक आणि उत्सवाच्या सेवा यांमुळे कलांना नियमित आधार मिळाला. त्यामुळे कला केवळ दरबारापुरती मर्यादित राहिली नाही, तर लोकजीवनात उतरली. हा देवालय–केंद्रित सांस्कृतिक विकास तंजावरची विशेष ओळख ठरला.

भरतनाट्यमच्या विकासात तंजावरच्या भोसल्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याआधी हा नृत्यप्रकार मुख्यतः मंदिरांतील देवदासी परंपरेशी निगडित 'सदिर' या स्वरूपात प्रचलित होता. भोसले राजांनी त्याला दरबारी सन्मान, आर्थिक आधार आणि कलात्मक संरक्षण दिले. तुकोजी, तुळजाजी आणि विशेषतः सरफोजी दुसरे यांच्या काळात नृत्य, संगीत आणि नाट्य यांचा विकास शिखरावर पोहोचला.तंजावरच्या चार भावंडांनी पोन्नैय्या, चिन्नैय्या, शिवानंदम् आणि वडिवेलू यांनी भरतनाट्यमचे आधुनिक रूप घडवण्यात मोलाचे काम केले. त्यांनी अलारिप्पू, जतिस्वरम्, वर्णम्, पदम् आणि तिल्लाना अशी नृत्याची रचनासारणी विकसित केली. हीच परंपरा नंतर भरतनाट्यमच्या प्रमुख शैलींना आकार देणारी ठरली. तंजावर हे केवळ राजधानी नव्हते,ते भरतनाट्यमचे एक महान कलाकेंद्र होते.

तंजावरच्या भोसल्यांनी कर्नाटक संगीताला उत्तम राजाश्रय दिला. त्यांच्या दरबारात तमिळ, तेलुगू, संस्कृत आणि मराठी भाषांतील साहित्य व संगीत वाढले. राजे स्वतः कवी, संगीतकार व विद्वान होते. सरफोजी दुसरे यांनी व्हायोलिन व क्लॅरिनेटसारखी पाश्चात्य वाद्ये कर्नाटक संगीतात आणण्याचा प्रयत्न केला; त्यांनी स्वतः अनेक संगीत व साहित्य रचना केल्या.

तंजावर चित्रकलेनेही जगभर प्रसिद्धी मिळवली. सोन्याची पाने, रत्ने, रंग आणि लाकडी फलक यांचा वापर करून तयार होणारी तंजावर चित्रशैली भोसले काळात विकसित झाली. देवी–देवतांची चित्रे, राजदरबारातील दृश्ये आणि धार्मिक विषय यांत तिची वैशिष्ट्ये दिसतात. तसेच तमिळ, तेलुगू, संस्कृत आणि मराठी या भाषांतील साहित्याला दरबाराने प्रोत्साहन दिले. शाहूजी प्रथमाने विद्वानांसाठी वसाहत स्थापन केली, तर नंतरच्या राजांनी साहित्यिक व धार्मिक ग्रंथांची निर्मिती वाढवली.

तंजावरच्या सांस्कृतिक इतिहासात सरफोजी दुसरे यांचे स्थान अत्यंत उंच आहे. त्यांनी राजवाड्यातील हस्तलिखित संग्रहाचे पुनर्घडन करून सरस्वती महाल ग्रंथालयाचा विस्तार केला. त्यात हजारो ताडपत्री हस्तलिखिते, संस्कृत, तमिळ, मराठी, तेलुगू आणि यूरोपीय भाषांतील ग्रंथ साठवले गेले. १८०५ साली त्यांनी राजवाड्यात देवनागरी छापखानाही स्थापन केला.सरफोजी दुसरे केवळ संग्राहक नव्हते. ते भाषा, विज्ञान, संगीत, धर्मशास्त्र आणि यूरोपीय शिक्षण यांचे अभ्यासक होते. त्यांनी शाळा, वैज्ञानिक उपकरणे, ग्रंथसंग्रह आणि कलावंतांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या काळात तंजावर हे भारतातील एक महत्त्वाचे ज्ञानकेंद्र बनले. ही परंपरा आजही सरस्वती महाल ग्रंथालयाच्या रूपाने जिवंत आहे.

(क्रमशः)




जात्यावरच्या ओव्या.....

नाही पडलास पाण्या
जीव कुठच लागेना
कस चालवू घरदार
झाली संसाराची दैना ||९०९||

नाही पडलास पाण्या
ढग झाले वांझोटे
आले होते भरून
गेले परतून खोटे ||९१०||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ८३



ज्योतिर्मय साहित्य

भगवान शंकरांनी त्यांची तपस्या भंग करणाऱ्या कामदेवाला आपला तिसरा डोळा उघडून भस्म केले. एवढे सामर्थ्य असणारे भगवान शंकर पार्वती मातेला श्रीरामांचे गुणवर्णन करून सांगतात. भगवान शंकर म्हणजे सामर्थ्य, ज्ञान आणि वैराग्य यांचे मूर्तिमंत प्रतीक ! माता पार्वती देखील काही कमी नाही. ती देखील ज्ञान, वैराग्य आणि साधना यांचे प्रतीक आहे. पण या दोघांमध्ये एक समानता आहे. दोघांच्याही अंतरात रामनामाबद्दल अतूट श्रद्धा आहे. एवढे प्रचंड सामर्थ्य ठायी असलेले भगवान शंकर आणि पार्वती जेथे प्रभू श्रीरामाचे ध्यान करतात तेव्हा रामनामाची महती सांगण्यासाठी आणखी कोणते उदाहरण द्यायला हवे ?



आपल्या मनातील कामवासना अनियंत्रित होत असेल, तर त्यावर नियंत्रण मिळवण्यास रामनाम हे अचूक आणि अमोघ अस्त्र आहे. परंतु अशा व्यक्तींनीच रामनाम घ्यावे असा याचा अर्थ नाही. ज्यांच्या ठायी ज्ञान, वैराग्य आणि शक्ती आहे अशा व्यक्ती देखील रामाचे ध्यान करतात. किंबहुना ज्ञान, वैराग्य आणि शक्ती प्राप्त होण्यासाठी रामनामासारखा दुसरा उपाय नाही असे देखील म्हणता येते. ज्ञान, वैराग्य आणि शक्ती यांचे अधिष्ठान रामनाम आहे. संत कबीर म्हणतात,'' कबिरा राम हृदय बसे, काम कहाँ घर होय ?'' जिथे हृदयात रामाला स्थान दिले, तिथे कामासारख्या गोष्टींसाठी जागाच कुठे उरते ?


स्वसंवाद : १. भगवान शंकर आणि माता पार्वती अत्यंत आदराने रामगुणांचे गायन करतात तरी देखील रामनामाचे महत्व मला स्वतःला पटवून देण्यासाठी अन्य गोष्टींची आवश्यकता वाटते का ?


२. ज्ञान, वैराग्य आणि सामर्थ्य हे गुण माझ्याकडे नसले, तरी या तिन्ही गुणांचे अधिष्ठान असणारे रामनाम घ्यावे असे मला वाटते का ?

३. माझ्या मनात जेव्हा एखादा वाईट विचार किंवा अनावर वासना डोके वर काढते, तेव्हा मी माझ्या ज्ञानाचा तिसरा डोळा (विवेक) उघडून तिला भस्म करतो का ?

(क्रमशः)







श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

जेथे नाम तेथे राम ।


ज्योतिर्मय साहित्य

नामाशिवाय जो जो विश्वास । ते ते अविश्वासाचे कारण आहे खास ।। नामाविण मानी सत्य । नाही त्याने जोडला भगवंत ।। नामाविण मानी जग । त्याचा होऊ देऊ नये विटाळ ।। नामाची जेथे मस्ती । तेथे रामाची वस्ती ।। याहून जे जे वाटले सुख । ते तेच दुःखाला कारण ।। देवळे सभामंडपे न येत कामा । ज्याने नाही ठेविले हृदयी रामा ।। राम करून घ्या आपुलासा । तोडा तोडा जन्ममरणाचा फासा ।। राम एक दाता । त्याचेवाचून नाही कोणी देता ।। नामाचे अनुसंधान । प्रपंचात सर्वांचे समाधान ।। जे जे होईल ते ते समाधानाचेच कारण । रामास व्हावे अर्पण ।। मोह, ममता, देहाचा अभिमान । हा संसाराचा पसारा जाण। तेथे ठेवू नये मन ।। नाही देहाला कष्ट देऊ । अनुसंधान न द्यावे बिघडू । नामात आहे समाधान । हा विश्वास ठेवावा पूर्ण ।।

मी मागतसे एक दान । ते द्यावे तुम्ही सर्वांनी ।। नामापरते नका मानू सुख । रामापायी करून घ्यावे आपणास अर्पण ।। याहून नको मज काही । एवढी भीक घालावी सर्वांनी ।। व्यवहार, लौकिक, विषयाची आवड । हेच परमार्थाला मुख्य येईल आड ।। त्यांना सारावे बाजूस । एक भजावे भगवंतास ।। नाही सत्य मानू जगी काही । रामाचा आसरा घ्यावा हृदयी ।। जोपर्यंत देहाचा संबंध । तोपर्यंत लौकिकाची चाड ।। देह जाईल उठाउठी । लौकिक कोठे राहील पाठी ? ।। त्याची धरू नये चाड । नाही सोडू भगवंत जाण ।। प्रपंचाच्या थोड्या सुखासाठी । नाही अंतर देऊ जगजेठी। चार वेद सहा शास्त्रे । सर्व केल्या स्मृति पारायण । तरी पण जोवरी मन नाही झाले स्थिर। तोवर तेथे कोठे समाधान ? ।। सर्व शास्त्रांचे सार । एक भजावा रघुवीर ।। नामी ठेवावे लक्ष पूर्ण । तेणे होईल समाधान ।। नामाची धरावी कास । देहादिक प्रपंचात न व्हावे उदास । हे सर्व साधे राखता अनुसंधान ।। आता करण्याचे उरले काही । हे किंचितही न आणावे मनी ।। मनाने व्हावे रामार्पण । सर्व सत्कर्म-साधनांचा कळस जाण ।। चित्त ठेवावे रामापाशी । ध्यास असावा त्याचा अहर्निशी ।। देहाने नाही करता आले । मन रामापायी गुंतवले । रामाने त्याचे कल्याण केले ।। राम ठेवील त्यात समाधान । हेच खरे भक्तीचे लक्षण जाण ।। गुरूकडून घेतलेले नाम। पावन करील जगास । हाच ठेवावा विश्वास । राम कृपा करील खास ।। देहाची स्थिति। कायम न राहे निश्चीत ।। ते सांभाळणे आहे जरूर । न विसरता रघुवीर ।। रामा, तुझ्याकरिता राहिलो । हा भाव ठेवावा निश्चीती । शक्य तो स्मरावा रघुपति ।।

रामचरणी लावावे मन । इतुके करावे तुम्ही थोडेफार । नाही करू दुसरी यातायात जाण ।।

***





देव एक का? कुठे, काम?

मित्रांनो आणि वाचकहो, अनेक संत महात्मे, विचारवंत गुरु, तत्ववेत्ते, आध्यात्म व्यक्ती आणि आपणही देव ईश्वर याबद्दल बोलतो ऐकतो विचार मांडतो. कुणी आपापल्या कुवतीप्रमाणे बुद्धीनुसार अधिकारवाणीने सांगतात. अनेक चर्चा, व्याख्याने होतात. देव कुठे, एक का अनेक. संतमहात्मे यांनी आत्मा परमात्मा हे सांगून देवाचे महत्व सांगतले. "एका राजाला साधूने सांगीतलं कि, तू दरबार भरव मी सर्व समक्ष सांगतो. त्या महात्म्याने एका गरीब शेतकर्याला साधुचा वेष दिला. व साधू गरीब शेतकरी बनला. सर्व दरबारातील लोकासमोर दहा बारा मणी मोजायला सांगितले. राजा एक मणी उचलून म्हणाला एक. दुसरा घेतला म्हणाला दोन.. साधू म्हणतो चूक एकच.. म्हणजे तुझ्या हातात एकच आहे! याचा अर्थ ईश्वर एकच! दुसरी गोष्ट दुधातून तूप काढण्यासाठी काही करावे लागते. माणसाला भोजन तसे देवाचे भोजन म्हणजे स्मरण, ध्यान, सत्संग निष्काम कर्म होय. राजाला सर्व पटते.. तो साधूरूपी गरिब किसानाला आपल्या गादीवर बसवितो, मग खरासाधू सांगतो.. देव रंकाचा राजा व राजाचा रंक असे करतो! आलं का लक्षात.. आज थांबतो स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा सुप्रभात.



फास्ट फूड आणि प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ टाळण्यासाठी पर्याय

ज्योतिर्मय साहित्य

आजच्या वेगवान आणि धावपळीच्या जीवनात, फास्ट फूड आणि प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ खाणे सोपे झाले आहे. भूक लागल्यावर लगेच ऑर्डर करणे किंवा पॅकबंद स्नॅक्स खाणे हा एक सोयीचा उपाय वाटतो. पण, या पदार्थांमध्ये जास्त प्रमाणात मीठ, साखर, अस्वास्थ्यकर स्निग्ध पदार्थ आणि रसायने असतात, जे आपल्या आरोग्यासाठी खूप हानिकारक आहेत. यामुळे वजन वाढणे, मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयविकारांसारख्या गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. सुदैवाने, या पदार्थांना पर्याय म्हणून अनेक आरोग्यदायी आणि चविष्ट पर्याय उपलब्ध आहेत.

१. घरचे जेवण हा सर्वोत्तम उपाय : फास्ट फूड टाळण्याचा सर्वात चांगला आणि सोपा मार्ग म्हणजे घरचे जेवण. बाहेरून आणलेल्या पदार्थांऐवजी घरी बनवलेले ताजे पोहे, उपमा, पराठे, थालीपीठ किंवा सँडविच नाश्त्यासाठी उत्तम आहेत. दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणासाठी घरी बनवलेली ताजी पोळी-भाजी, डाळ-भात किंवा खिचडी हे अधिक पौष्टिक आणि आरोग्यदायी पर्याय आहेत. घरचे अन्न तयार करताना आपण तेल, मीठ आणि मसाल्यांचे प्रमाण नियंत्रित करू शकतो, ज्यामुळे ते अधिक पौष्टिक आणि सुरक्षित बनते.

२. 'स्मार्ट स्नॅक्स' निवडा : ऑफिसमध्ये किंवा प्रवासात भूक लागल्यास चिप्स, बिस्किटे किंवा पॅक केलेले स्नॅक्स खाण्याऐवजी काही आरोग्यदायी पर्याय जवळ ठेवा. भाजलेले चणे, शेंगदाणे, मखाना, भेल, मुरमुरे,

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

शेंगदाणा लाडू किंवा ताजी फळे हे उत्तम पर्याय आहेत. दही, ताक, लिंबू पाणी किंवा नारळ पाणी यांसारखी पेये सोडा आणि कृत्रिम साखरेच्या पेयांऐवजी अधिक आरोग्यदायी आहेत.

३. प्रथिने आणि फायबरयुक्त पदार्थांवर भर द्या : प्रथिने आणि फायबरयुक्त पदार्थ भूक लवकर शांत करतात आणि पोट भरलेले ठेवतात, ज्यामुळे तुम्हाला वारंवार खाण्याची इच्छा होत नाही. कडधान्ये (जसे की मूग, हरभरा), डाळी, भाज्या आणि फळांचा आहारात समावेश करा. सलाड, सूप आणि अंकुरित कडधान्ये हे चांगले स्नॅकिंग पर्याय आहेत. यामुळे पचनक्रिया सुधारण्यासही मदत होते.

४. अन्न नियोजन करा : आठवड्याभरासाठी जेवण आणि स्नॅक्सचे नियोजन केल्यास फास्ट फूडवर अवलंबून राहणे कमी होते. जर तुम्हाला वेळ मिळत नसेल, तर आठवड्याच्या शेवटी भाज्या चिरून ठेवणे किंवा काही पदार्थ (उदा. डाळी भिजवून ठेवणे) आधीच तयार करून ठेवल्यास वेळ वाचतो आणि अचानक बाहेरचे खाण्याची गरज भासत नाही.

५. पाण्याची बाटली जवळ ठेवा : अनेकदा आपल्याला भूक लागल्यासारखे वाटते, पण ती तहान असते. शरीरात पाण्याची कमतरता असल्यास मेंदू भुकेचा चुकीचा संदेश देऊ शकतो. त्यामुळे, दिवसभर पुरेसे पाणी पिणे महत्त्वाचे आहे. पाणी पिण्याने अनावश्यक खाणे टाळता येते आणि शरीर हायड्रेटेड राहते.

या सोप्या उपायांचा अवलंब केल्यास फास्ट फूड आणि प्रक्रिया केलेले पदार्थ टाळून तुम्ही एक निरोगी आणि आनंदी जीवन जगू शकता. हे पर्याय केवळ आरोग्यासाठीच चांगले नाहीत, तर चवीलाही उत्कृष्ट आहेत.

***



चंद्र

चंद्राचे सौंदर्य छान
रात्रीच्या नभांगणी पाहता
भान माझे हरपते
हळूहळू पूढे जाताना
चंद्र पाहतो मज
विचाराने मन आनंदते

चंद्राचे प्रतिबींब मी
पाण्यात पाहते अन्
गाली खुदकन हसते
रात्रीचा छान खेळ
नभांगणात सुरु असताना
सौंदर्य त्याचे निहाळते

माझी गझल माणुसकीचा शोध घेते - गिरीश जोशी

जीवन विकास वाचक व्यासपीठची दहावी बैठक संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - जीवन विकास ग्रंथालयाच्या वाचक व्यासपीठचा दहावा साहित्यिक संवाद सोमवारी संपन्न झाला. याप्रसंगी बोलताना कवी गझलकार गिरीश जोशी म्हणाले, मला या शहराने घडवले आहे. कवितेने माझे बोट पकडून मला गझलेच्या स्वाधीन केले. मन मोकळं करण्यासाठी मी लिहितो, गझल मला प्रवाही ठेवते. माझी गझल माणुसकीचा शोध घेते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी गझलकार गिरीश जोशी आणि गझलकार रमेश



ठोंबरे यांचे स्वागत प्राचार्य जीवन देसाई आणि डॉ. राजशेखर बालेकर यांनी केले. डॉ. विनोद सिनकर यांनी प्रास्ताविकातून गिरीश जोशी यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आणि वाचक व्यासपीठ संकल्पना स्पष्ट केली. मी दिवा विझवला नाही या गिरीश जोशी यांच्या नव्या गझलसंग्रहाबद्दल रमेश ठोंबरे यांनी आपले विचार मांडले. गिरीश जोशी यांनी आपला काव्य प्रवास सांगताना उपस्थित रसिकांशी मनमोकळा संवाद साधला. त्यांनी कवी सुभाष महाजन, रश्मी देशपांडे, श्रीकांत उमरीकर, जीवन देसाई आदींच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. वाचक व्यासपीठाच्या या दहाव्या बैठकीस कवी सुनील उबाळे, डॉ. पांगरेकर, नृसिंह कुलकर्णी, सौ. संगीता मंडलिक, सौ. सुरेखा काणे, देवीदास देशपांडे, ऋषभ कुलकर्णी, डॉ. गणेश कुलकर्णी, कल्याणी कोळपकर, गुलाबराव मगर, सुनील वायाळ, विश्वनाथ ससे, श्री. व सौ. चिमणपुरे, श्री व सौ. किनगावकर यांच्यासह रसिकश्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनोद सिनकर यांनी केले, तर श्रीकांत उमरीकर यांनी आभार मानले.

भारतीय ज्ञान शाखांचे एकात्मीकरण - काळाची गरज

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या भारत देशाला ज्ञानाची अखंड परंपरा लाभलेली आहे. वैदिक काळापासून ते आज तागायत विविध ज्ञान शाखांनी ती सांभाळली आहे. पुर्वीची गुरूकुल पद्धती वेदांवर आधारित होती. ही शिक्षण व्यवस्था राजसत्तेच्या नियंत्रणापासून मुक्त होती हे तिचे वैशिष्ट्ये होते. कालांतराने इसवी सन आठवे शतक ते अठराव्या शतकापर्यंत शिक्षण पद्धतीचे स्वरूप धार्मिक, सांस्कृतिक आणि व्यावसायिक असे बदलत गेले. मुस्लिम राजवटीच्या प्रभावामुळे यात प्रवाह पडले गुरुकुल आणि पाठशाला मकतब आणि मदरसा. हे प्रवाह धार्मिक ग्रंथांना सर्वोच्च प्राधान्य देणारे होते. नंतर लौकिक विषयांचा समावेश या प्रवाहातील अभ्यासक्रमात केला गेला, ज्यामध्ये साहित्य, इतिहास, गणित, ज्योतिष शास्त्र, आयुर्वेद, युनानी वैद्यकशास्त्र या विषयांचा समावेश करण्यात आला. रोजगारभिमुख शिक्षण मात्र फक्त कुटुंबातच दिले जाई. विविध कला हस्तकला एवढेच काय ते व्यावसायिक शिक्षण. भारतीय आधुनिक काळातील शिक्षण पद्धतीवर मात्र दिर्घकाळ ब्रिटिशांचा प्रभाव राहिला. आजही पालक प्रवेशासाठी मुलांना घेऊन शाळेत आले की माध्यम इंग्रजी च हवे असा आग्रह करतात. खरे तर ब्रिटिशांनी प्रशासकीय कामांसाठी इंग्रजी जाणणारे कर्मचारी तयार करण्याच्या उद्देशाने आधुनिक आणि औपचारिक शिक्षणाचा पाया रचला. यासाठी १८१३ मध्ये सनद कायद्याची अंमलबजावणी करत भारतीय साहित्य आणि विज्ञानाच्या प्रसारासाठी निधीची तरतूद करण्यात आली. १८३५ मध्ये मेकॉलेच्या शिफारशीनुसार इंग्रजी हे शिक्षणाचे माध्यम बनले. पुढे ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, राजा राम मोहन रॉय ,शाहू महाराज यांनी तळागाळातील विशेषत: महिलांच्या शिक्षणासाठी चळवळ उभी केली. १९६८ ला कोठारी आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांवरून पहिले भारतीय राष्ट्रीय शिक्षण धोरण अंमलात आले .नंतर १९८६,१९९२ पर्यंत हे धोरण नवीन ध्येय आणि उद्दिष्टांना समोर ठेवून बदलत गेले. २९ जुलै २०२० ला ३४ वर्ष जुन्या शिक्षण धोरणाच्या जागी नवीन धोरण लागू करण्यात आले. या शिक्षण धोरणाचा मुख्य उद्देशच एका समग्र बहुविद्याशाखीय दृष्टिकोनातून भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवणे हा आहे. हा उद्देश परत आपल्याला प्राचीन भारतीय ज्ञान शाखांकडे घेऊन जातो .कारण ज्या कालखंडामध्ये भारतामध्ये ही बहुविद्याशाखीय शिक्षण पद्धती अवलंबल्या जात होती तेव्हा भारत स्वायत्त, समृद्ध होता. देशोदेशींचे विद्यार्थी नालंदा, तक्षशिला येथे विविध विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी येत असत. जगभरामध्ये असे निवासी विद्यापीठ भारतात होते हे नव्याने सांगायला नको.



कृषी, अभियांत्रिकी, भाषाशास्त्र ,साहित्य ,गणित, खगोलशास्त्र, प्राणीशास्त्र, शरीर शास्त्र, तत्त्वज्ञान, अध्यात्म, योग, स्थापत्य, क्रीडा ,साहित्य औषधशास्त्र, वन व्यवस्थापन ,खेळ, पारंपारिक पीक लागवड तंत्र, नैसर्गिक शेती, आदिवासींचे ज्ञान, पारंपारिक व्यावसायिक शिक्षण या सर्व विद्या शाखांना भारतीय ज्ञानाने जोपासले आहे .आज आपण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जोरावर हवे ते आत्मसात करण्याच्या प्रयत्नात आहोत परंतु या हव्यासापायी आपले खरे ज्ञान कौशल्य आपण विसरता कामा नये .आज नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी जरी अडचणी येत असल्या तरी त्यावर मात करत आमचे शिक्षक नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून कृती, उपक्रम, प्रयोग, प्रकल्प व अनेक अध्यापन पद्धतींचा वापर करून उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करत आहेत. प्रशासकीय स्तरावरूनही प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षक सजग सर्जनशील आणि प्रवाही होत आहेत. विद्यार्थी केंद्रित असलेली असलेले हे शैक्षणिक धोरण समता या घटनात्मक मूलतत्त्वावर आधारित आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात देश पातळीवर याचे सकारात्मक बदल दिसून येतील हे निश्चित!

भारतीय संस्कृती अनादी काळापासून ते आजपर्यंत समृद्ध व अनुकरणीय आहे - महंत रामगिरी महाराज

ज्योतिर्मय साहित्य

वैजापूर (गोकुळसिंग राजपूत) - ''विजयादशमी (दशहरा) सारखे उत्सव हे आमच्या अनादीकाळापासून चालत आलेले उत्सव आमच्या भारतीय संस्कृती व मानवी मूल्यांचे आदर्श ऊर्जा स्थान आहेत.सर्व जगाला ज्ञान, मान, सन्मान,शास्त्र व नीती शिकविणारी भारतीय संस्कृती जगातील एकमेव आदर्श संस्कृती आहे'' असे प्रतिपादन सरला बेट येथील गोदाधामचे मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शाखा वैजापूरने आयोजित केलेल्या विजयादशमी निमित्त आयोजित समारोपीय कार्यक्रमात सोमवार (ता,२६) रोजी केले.या प्रसंगी डीएड कॉलेजच्या मैदानावर आयोजित कार्यक्रमात सर्वप्रथम



शस्त्रपूजन करण्यात येऊन डॉ. हेडगेवार, हिंदवी स्वराज्य संस्थापक जाणते राजे छत्रपती शिवाजी महाराज व गोळवलकर गुरुजी यांच्या प्रतिमांना अभिवादन ही करण्यात आले. नंतर भगवा ध्वज फडकविण्यात आला. या प्रसंगी प्रमुख वक्ते डॉ.प्रसन्न अनंतराव पा, गद्रे यांनी उपस्थिताना संबोधित करतांना संघाच्या स्थापनेचा उद्धेश, धर्म, स्वयंसेवकांचे सेवा भावी कार्य व विविध सामाजिक उपक्रमातील त्यांच्या भूमिकाचे कर्तव्य विशद केले. भारतीय ज्ञान, विज्ञान, नियम संविधान, उपासना, यांचे योग्य वेळी उपयोग करणे हे खरे शस्त्रपूजन आहे, असे संबोधित केले. ज्ञान पिठावर नगर संघचालक अरुण जगताप यांची उपस्थिती होती. प्रास्तविकात सूर्यवंशी यांनी संघाने आपल्या पंचसूत्रीच्या आधारे जिल्ह्याभर केलेल्या उपक्रमांचा सविस्तर वृत्तांत सादर केला. या प्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पा. गलांडे, नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, दशरथ बनकर, डॉ. राजीव डोंगरे, वैजिनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघ अध्यक्ष- प्रकाश शेठ बोथरा, सचिव ठा. धोंडीरामसिंह राजपूत, अशोक पवार, उत्तमराव साळुंके, तसेच जेष्ठ नागरिक व ऍड.मनोज दिवाकर, घनश्याम आसर, मनोज वरखेडे, अशोक धसे, जवाहर कोठारी, मोठया संख्येने पुरुष व महिला वर्ग उपस्थित होता. शेवटी प्रार्थना होऊन कार्यक्रम संपला.

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त गायन व भावगीतांचा सुरेल कार्यक्रम उत्साहात

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - दि. २५ ऑक्टोबर, रविवार रोजी विवेकानंद उद्यान, सिडको एन-४ येथे शालिवाहन शाखा व आदिशक्ती महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कोजागिरी पौर्णिमेनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संगीत, गायन आणि भावगीतांच्या सुरेल मैफलीमुळे उपस्थितांना आनंददायी व संस्मरणीय संध्याकाळ अनुभवायला मिळाली.

कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात आदिशक्ती महिला मंडळाच्या वतीने गायन व भावगीतांचा भरगच्च कार्यक्रम सादर करण्यात आला. विविध सुरेल गीतांनी कार्यक्रमात रंगत आणली. संगीताच्या माध्यमातून उपस्थितांना



आनंदाचे क्षण अनुभवता आले. महिला मंडळाच्या सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी केला.


या कार्यक्रमाला शालिवाहन शाखेतील स्वयंसेवक तसेच आदिशक्ती महिला मंडळाच्या सदस्यांची आवर्जून उपस्थिती होती. अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे सामाजिक बांधिलकी दृढ होण्यासोबतच परस्परांमधील स्नेहभाव, एकोपा आणि सांघिक भावना वृद्धिंगत होण्यास मदत होते.


या प्रसंगी श्री. शिवशंकर मुंढे, श्री. मोहन कुलकर्णी, श्री. महाजन यांच्यासह महिला मंडळाच्या सौ. दीक्षा, सौ. रंजना महाजन, सौ. पातूनकर तसेच इतर सदस्य उपस्थित होते.

कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या सुरेल कार्यक्रमामुळे परिसरात आनंदी आणि उत्साही वातावरण निर्माण झाले. शालिवाहन शाखा व आदिशक्ती महिला मंडळाच्या पुढाकारातून पार पडलेल्या या उपक्रमाने सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजातील स्नेहबंध अधिक दृढ करण्याचा सुंदर संदेश दिला.











जेष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबीर संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – सदाचार संवर्धक ज्येष्ठ नागरिक संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिक दिन व कोजागिरी पौर्णिमेनिमित्त रविवार, दिनांक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता श्री विश्वेश्वर महादेव मंदिराच्या सभागृहात मासिक सभेचे आयोजन करण्यात आले होते. श्री बाबुराव दुधगावकर यांच्या बासरी वादनाने सभेला सुरुवात झाली.



या कार्यक्रमास शहरातील प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. अजय गौर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी संस्थेतील जवळपास ७० ते ८० ज्येष्ठ नागरिकांच्या हाडांच्या ठिसूळपणाची तपासणी करून वाढत्या वयात हाडांची योग्य काळजी घेण्याचे महत्त्व, हाडांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना तसेच हाडांशी संबंधित विविध समस्यांबाबत उपस्थित सभासदांना सविस्तर मार्गदर्शन केले. या आरोग्यविषयक उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांना हाडांच्या आरोग्याविषयी महत्त्वपूर्ण माहिती मिळाली.

याच कार्यक्रमात संस्थेच्या ज्येष्ठ सभासद सौ. सुषमा शशिकांत वझे यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस साजरा करण्यात आला. तसेच आचार्य रमेश धोंडोपंत, सौ शोभना अशोककुमार बोरसे, श्रीमती कुबेरकर आशा अरविंद, सौ विना विजय, सुहास सुमंत कुलकर्णी, शेवाळे शिवाजी दत्तात्रेय, जुगलकिशोर रामकिशन मंत्री, सौ माधुरी पंडितराव दुसे , सौ माया बाळकृष्ण पटवारी, दत्तात्रय प्रभाकर सराफ, पीलखाने शशिकांत मधुकर, श्रीमती वंदना जयकुमार बोधनकर, श्रीमती देशपांडे सुधा रामचंद्र, विजय शशिकांत चिंतामण, कोंडेकर दिलीप मोतीलाल या सदस्यांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. यानंतर संस्थेचे पूर्व अध्यक्ष अनंत आचार्य यांची फेसकॉम च्या छत्रपती संभाजीनगर विभागीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संस्थेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अनिल चौधरी होते. यावेळी उपाध्यक्ष रमेश दुसे, सचिव बाळासाहेब देशपांडे, सहसचिव अनिल माधवराव कुलकर्णी, तसेच सदस्या सौ. रोहिणी कुलकर्णी व सौ. शैलजा आचार्य उपस्थित होत्या.

सभेचे सूत्रसंचालन श्री. अनिल कुलकर्णी यांनी केले. अध्यक्षीय समारोपानंतर सचिव श्री. बाळासाहेब देशपांडे यांनी आभार प्रदर्शन केले. शेवटी पसायदानाने सभेची सांगता झाली.

ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य, आरोग्यविषयक जागरूकता आणि निरोगी जीवनशैली यांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीयश अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा रेड एफएम ९३.५ च्या 'टशनबाज २०२६' सांस्कृतिक स्पर्धेत विजय

ज्योतिर्मय साहित्य



छत्रपती संभाजीनगर – रेड एफएम ९३.५ तर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येणारी प्रतिष्ठेची 'टशनबाज २०२६' ही सांस्कृतिक स्पर्धा यंदाही उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत श्रीयश टेक्निकल कॅम्पसच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन करत उल्लेखनीय यश संपादन केले. स्पर्धेच्या अंतिम फेरीत २४ महाविद्यालयांतील ३० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. या चुरशीच्या स्पर्धेत श्रीयश अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या महेश वाघमारे आणि पार्थ सराफ यांनी बीटबॉक्सिंग व संगीताचा अभिनव संगम सादर करून उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या दमदार आणि नावीन्यपूर्ण सादरीकरणाने परीक्षकांची व प्रेक्षकांची दाद मिळवत त्यांनी ग्रँड फिनालेमध्ये विजेतेपद पटकावले. या यशाबद्दल त्यांना प्रमाणपत्रे, रोख पारितोषिक आणि गिफ्ट व्हाउचर्स देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेच्या ग्रँड फिनालेसाठी श्रीयश आयुर्वेदिक महाविद्यालय व हॉस्पिटल रिसर्च सेंटरचे विद्यार्थी समीर मिर्झा आणि प्रणय उदगीरे यांचीही निवड झाली होती. त्यांनी गायन, वाद्यवादन आणि रॅपच्या माध्यमातून आपल्या कलेचे प्रभावी सादरीकरण करत प्रेक्षकांची वाहवा मिळवली. तसेच श्रीयश फार्मसी महाविद्यालयाची विद्यार्थिनी श्रुती गुलालकर हिने आपल्या उत्कृष्ट नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. ह्या कार्यक्रमाच्या आयोजनात या सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. अनिल पालवे ह्यांनी मोठी भूमिका बजावली. सर्व विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. आर्विन वाव्हळे आणि फार्मसी महाविद्यालयाच्या प्रा. पूजा जामोदे यांचे मार्गदर्शन लाभले.

सलग दुसऱ्या वर्षी हि स्पर्धा जिंकल्याबद्दल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील, डीन अॅकेडेमिकस डॉ. पी. एम अर्धापुरकर, आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्वाती इटगी आणि फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मंगेश घोडके यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या कला, सर्जनशीलता आणि व्यक्तिमत्त्व विकासाला प्रोत्साहन देण्याच्या संस्थेच्या प्रयत्नांना या यशामुळे बळ मिळाले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे तसेच मुख्याधिकारी कमांडर सतीश चौथनकर यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

ज्ञानदा प्रशालेत राष्ट्रीय जंतनाशक मोहीम साजरी

ज्योतिर्मय साहित्य



कर्वेनगर – ज्ञानदा प्रतिष्ठान संचलित, अॅड. डी. आर. नगरकर प्रशाला, कर्वेनगर येथे आज राष्ट्रीय जंतनाशक दिन उत्साहात पार पडला.

पुणे महानगरपालिकेच्या आदेशानुसार इयत्ता ५ वी ते १० वीच्या सर्व विद्यार्थ्यांना ४०० ची गोळी शिक्षकांच्या उपस्थितीत देण्यात आली. यावेळी २४२ विद्यार्थी उपस्थित होते. जंतांमुळे होणारे आजार टाळून विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ ठेवणे हा या मागचा उद्देश असल्याचे मुख्याध्यापिका सौ. स्वाती कुलकर्णी यांनी सांगितले. यासाठी थरकुडे हॉस्पिटल यांच्यामार्फत गोळ्या उपलब्ध करून देण्यात आल्या. मा. आरोग्य अधिकारी डॉ. नीना बोराडे मॅडम, मा. सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे, मा. सहाय्यक आरोग्य अधिकारी विद्या नागमोडे मॅडम, मा. क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी डॉ. गणेश ढमाले सर वैद्यकीय अधिकारी शुभांगी शहा यांचे मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री. उदयन पाठक, कार्यवाह श्री. मंदार शेंडे, सहकार्यवाह सौ. माणिक कुलकर्णी यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी आरोग्य चांगले ठेवणे, पोषण व्यवस्थित ठेवणे, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावणे याची माहिती देण्यात आली. त्याच बरोबर डेंग्यू, मलेरिया आजारांपासून बचाव करणे, डासांची उत्पत्ती नष्ट करणे, पाणी साठवून ठेवू नये, वयक्तिक स्वच्छता इत्यादी बाबींची माहिती देण्यात आली. गैरहजर विद्यार्थ्यांना ३ नोव्हेंबर रोजी मॉप-अप दिनी गोळी दिली जाणार आहे.

नव्या पिढीमध्ये मराठीविषयी अभिमान निर्माण करण्याची गरज-प्रा. परदेशी

संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा विशेष व्याख्यान

ज्योतिर्मय साहित्य



छत्रपती संभाजीनगर – मराठी भाषेचे जतन, संवर्धन आणि नव्या पिढीमध्ये भाषेविषयी अभिमान निर्माण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्रा. दौलतसिंग परदेशी यांनी येथे केले. सोयगावमधील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात मराठी विभागातर्फे अभिजात मराठी भाषा सप्ताह-२०२६ अंतर्गत अभिजात मराठी भाषा : वर्तमान आणि भविष्य या विषयावर विशेष व्याख्यानात प्रमुख व्याख्याते म्हणून परदेशी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिरीष पवार होते.

प्रा. परदेशी यांनी मराठी भाषेची ऐतिहासिक परंपरा, तिचे वर्तमानातील स्थान आणि आधुनिक काळातील आव्हाने यांवर प्रकाश टाकून नव्या पिढीला मराठीचे महात्म्य समजून सांगणे आवश्यक असल्याचे सोदाहरण स्पष्ट केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी मराठी भाषेचे सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. अभिजात भाषेचा दर्जा ही मराठी भाषेसाठी अभिमानाची बाब असून, तिच्या विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करून वाचन, लेखन आणि साहित्य संवर्धनाची परंपरा समृद्ध करावी, असे आवाहन प्राचार्य पवार यांनी केले.

मराठीला समृद्ध वारसा

मराठी विभाग प्रमुख डॉ. रमेश औताडे यांनी प्रास्ताविकातून अभिजात मराठी भाषेचा समृद्ध वारसा, तिची साहित्यिक परंपरा आणि सांस्कृतिक महत्त्व विशद केले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे निर्माण झालेल्या संधींचा उल्लेख करून मराठी भाषेच्या संवर्धनासह प्रचार-प्रसारासाठी सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन केले.

सूत्रसंचालन डॉ. ज्योती स्वामी यांनी, तर आभार प्रदर्शन प्रा. शिवाजी सिरसाट यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळेत विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप; महानगरपालिका आरोग्य विभागाचा उपक्रम

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – दि. २७ ऑक्टोबर २०२६ महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर आरोग्य विभागाच्या वतीने आज संत तुकाराम प्राथमिक विद्यालय, डॉ. आंबेडकर नगर, छत्रपती संभाजीनगर येथे विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

मध्यान्ह भोजनानंतर मुख्याध्यापक संदिप सोनवणे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या. या वेळी शिक्षक साहेबराव शिंदे, सुनील चौधरी, किरणकुमार सोनवणे, विजय पाटील, हर्षल पगारे, रत्नमाला घोरपडे,शीतल घुगे व सुनीता शेजुळ तसेच महानगरपालिका आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

जंतनाशक गोळ्या मध्यान्ह भोजनानंतर देण्यात आल्याने विद्यार्थ्यांना कोणताही त्रास होऊ नये, याची विशेष काळजी घेण्यात आली.




आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना गोळ्या घेण्याचे महत्त्व सोप्या शब्दांत समजावून सांगितले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना रांगेत शिस्तीने गोळ्या घेण्यासाठी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही शिस्त पाळत उपक्रमाला चांगला प्रतिसाद दिला.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ ठेवणे, तसेच पोटातील जंतांमुळे होणाऱ्या आजारांना प्रतिबंध घालणे हा आहे. जंतांमुळे मुलांमध्ये अशक्तपणा, भूक कमी लागणे, थकवा जाणवणे अशा समस्या निर्माण होऊ शकतात. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर आणि एकूण वाढीवर होतो. त्यामुळे अशा उपक्रमांचे महत्त्व मोठे आहे.

मुख्याध्यापक संदिप सोनवणे यांनी या वेळी बोलताना सांगितले की, विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले असेल तरच त्यांचे शिक्षणात लक्ष लागते. जंतनाशक गोळ्यांमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते. त्यामुळे पालकांनीही आपल्या पाल्यांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे, नियमित हात धुणे, नखे कापणे, स्वच्छ पाणी पिणे अशा स्वच्छतेच्या सवयी जोपासाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

महानगरपालिका आरोग्य विभागाने वेळोवेळी शाळांमध्ये असे आरोग्यविषयक उपक्रम राबविल्यास विद्यार्थ्यांच्या आरोग्याला मोठा लाभ होईल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या उपक्रमाबद्दल शाळेच्या वतीने महानगरपालिका आरोग्य विभागाचे व उपस्थित कर्मचाऱ्यांचे आभार मानण्यात आले.



मुलांसाठी बोधकथा

आर.पी. दुसे, 94 22202747

संकल्प शक्ति यशाची पायरी

हमखास यशस्वी व्हावयाचे असल्यास आपल्या सामर्थ्या वर संकल्पावर दृढ विश्वास पाहिजे. आपले जीवन ज्योतिर्मय बनवावया चे असल्यास त्याला आपल्या कर्तृत्व शक्ति ने विवेकानी पणाला लावली पाहिजे. दृष्टी आणि कल्पना शक्तीच्या जोरावर कर्तृत्व निर्माण करण्या साठी पुष्टी मिळत असते. आपल्याकडे पाहण्याची आपलीच दृष्टी आपल्या संकल्प पूर्ति कडे खेचित असते. आपल्या सकारात्मक विचाराला चालना देत असते. आपल्यातील भित्रे पणा घालवत असते. आपण लक्ष्मी प्राप्तीच्या मागे धावण्यापेक्षा लक्ष्मी आपल्या पाठीशी धावावी अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी आपण विचाराने कृतीने सक्षम असले पाहिजे. मर्यादा आणि संयमाने कृती ला वेगळीच उंची प्राप्त होत असते ह्याचे सदोदीत स्मरण ठेवले पाहिजे. स्वतःच्या विचाराला निर्णयाला महत्व देण्याचे धाडस दाखविले पाहिजे तरच आव्हानाला तोंडं देण्याची संघर्ष शक्ती आपल्यात निर्माण
झाल्याशिवाय रहात नाही. एकदा का अशा सकारात्मक उर्जेचा आपल्या अंगी प्रवेश झाला की मग मानसिक बळ निर्माण होण्यास काहीच विलंब नसतो. अर्थात चांगल्या सल्ल्याचा आदर ठेव
अहं दूर ठेवण्यासाठी गरजेचे आहे.
पुरुषोत्तम प्रभू रामा नी अनेकांचे सल्ले ऐकून घेतले कोणाचा ही अपमान केला नाही. पण शेवटी मनाला जे भावले पटले योग्य वाटले तेच विचार पूर्वक निर्णय घेतले . पण प्रकर्षाने हनुमान, जांबुवंत, सुग्रीव, बिभिषण, यांच्या सल्ल्या ला ही मान दिला आणि यशाचा झेंडा फडकावला हे आपणास ही ज्ञात आहे.
मुलानों ह्या प्रकरणी मला एक प्राचिन कथा आठवते ती अशी आहे. एका राक्षसाला आपल्या कामासाठी एका माणसाची गरज होती अनेक ठिकाणी त्यानी त्यासाठी चौकशी केली पण त्याला चांगला माणूस काही मिळेना कारण त्याला प्रत्येकात काहीना काही त्रुटी दिसत होत्याच. शेवटी शोधाशोध करून एक गरिब व्यक्ती त्याला मिळाली. त्याचा शांत आणि कष्टाळू स्वभाव राक्षसाला मनस्वी भावला होता. तो माणूस राक्षस सांगेल ते काम अविरत विनातक्रार करत असे. पण राक्षस दुष्ट वृत्तीचा असल्यामुळे तो त्या समंजस कष्टकरी मानसास नेहमी आपल्या शैली मध्ये धमकावत असे आणि त्याला भिती दाखवत असे की कामात हलगर्जीपणा केलास तर मी तुला सहज खाऊन टाकीन. किंवा क्रूरतेने मारून टाकीन. त्याच्या ह्या भितीदायक धमक्या मुळे स्वतःचे विचार बाजूला ठेवून तो तन्मयतेने दुप्पट वेगाने काम करीत असे. (क्रमशः)

निसर्ग वाचला तरच अन्नधान्य मिळेल! अन्नधान्य मिळाले तरच सर्वसृष्टी वाचेल!

मधुकर निलेगावकर, पुणे ९४२१३७५६९१

दरवर्षी जागतिक अन्नधान्यदिन जगभर साजरा केला जातो. तसाच तो याहीवर्षी साजरा झाला.
परंतु,आता या एकविसाव्या शतकाच्या तिस-या दशकात मात्र जागतिक अन्नधान्यदिनाच्या निमित्ताने अन्नधान्याच्या निर्मितीबाबत त्याच्या पूर्ततेबाबत आणि सुरक्षेबाबत तसेच, तसेच, नैसर्गिक पर्जन्याच्या पृथ्वीवर पडणा-या नियमिततेबाबत व पावसाच्या पाण्याच्या नियमित पूर्ततेबाबत व सुरक्षेबाबत अनेक प्रश्नचिन्ह जगभरात सर्वत्र उपस्थित झाले आहेत. त्यामुळे, अन्नधान्याचे नियमित चांगल्याप्रकारे उत्पादन होण्यासाठी योग्य प्रमाणात पाऊस व योग्य प्रमाणात उन्हाची अत्यंत आवश्यकता असते. तरच, अन्नधान्याचे उत्पादन व्यवस्थितपणे व मुबलक होवू शकते. परंतु, एकविसाव्या शतकाच्या या तिसऱ्या दशकात निसर्गाचे व पृथ्वीच्या स्थिर संतुलनाचे प्रमाण खूपच बिघडलेले आहे. त्या कारणामुळे उन्हाळा,पावसाळा व हिवाळा या ऋतूंचे प्रमाणही बदलले असून ते खूप बेभरवशाचेही झाले आहे. त्या कारणास्तव उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे पाऊस,ऊन, व पाणी यांचे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे, अशी परिस्थिती का उद्भवलेली आहे याचे उत्तर शोधण्यासाठी आपल्याला मागील शतकातील काही दशकांच्या इतिहासाचा आढावा घ्यावा लागेल व त्याचा अभ्यासही करावा लागेल तरच खरी वस्तुस्थिती आपल्या निदर्शनास येऊ शकेल.या अनंत अशा विश्वाचा कारभार चालतो तोत्या जगंनियंत्या परमेश्वरामुळेच! त्याच्या कृपेनेच या जगातील मनुष्यसृष्टी, जीवसृष्टी व निसर्गसृष्टी याचं जीवनकार्य अविरतपणे चालू असतं. यूगानुयुगे, शतकानुशतके हे चालूच आहे. या जगातील सर्व माणसांच्या तीन प्रमुख अत्यावश्यक गरजा आहेत.एकोणिसाव्या त्या व्यवस्थित असतील तरच माणसांचे जीवन व्यवस्थितपणे चालते. वस्त्र आणि निवारा या दैनंदिन नित्याच्या लागणा-या बाबी नाहीत. पण, अन्न मात्र कोणत्याही माणसाला रोजच्या जेवणात आवश्यकच असते. त्याशिवाय आपले जीवन जगूच शकत नाही. हे त्रिकालाबाधित सत्य आहे. एकोणिसाव्या शतकापासून या जीवनचक्रात बदल होण्यास सुरूवात झाली. (क्रमशः)

कुटुंबप्रमुख हवा आहे! - भाग १६ : धैर्य, सहनशीलता आणि नम्रता

ज्योतिर्मय साहित्य

दुसऱ्या दिवशी श्रीराम शाळेतून घरी आल्यावर आजोबांकडे गेला.

''आजोबा, आधी माझा अभ्यास पूर्ण करतो आणि मग येतो मनाचे श्लोक समजून घ्यायला.''

''उत्तम! आधी अभ्यास पूर्ण करून ये,'' आजोबा म्हणाले.

अर्ध्या तासाने श्रीराम आणि श्रुतकीर्ती आजोबांकडे आले.

''चला मुलांनो, आज समर्थ रामदास स्वामींचा पुढचा श्लोक पाहू,'' आजोबा म्हणाले. दोन्ही मुले उत्सुकतेने बसली.

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावे।
मना बोलणे नीच सोशीत जावे।।
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावे।
मना सर्व लोकांसि रे निववावे।।६।।

धैर्य म्हणजे केवळ संकटांना सामोरे जाणे नव्हे, तर प्रतिकूल परिस्थितीतही योग्य निर्णय घेणे. सहनशीलता म्हणजे अन्याय सहन करणे नव्हे; तर मतभेदांच्या वेळी संयम राखून समजुतीने मार्ग काढणे. नम्रपणे बोलल्याने संवाद सुलभ होतो आणि परस्परांतील कटुता कमी होते.

कुटुंबात वेगवेगळ्या वयोगटांतील व्यक्ती असतात. त्यांचे अनुभव, विचार आणि अपेक्षा वेगवेगळ्या असू शकतात. म्हणून एकमेकांचे म्हणणे शांतपणे ऐकणे आणि नम्रपणे आपले मत मांडणे आवश्यक आहे. कुटुंबप्रमुखाने सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले, तर प्रत्येकाला आपले विचार मांडण्याचा विश्वास मिळतो.

''आजोबा, आपल्या घरात कुटुंबप्रमुख कोण आहे?'' श्रुतकीर्तीने विचारले.

''जा बरं, आईला विचार,'' आजोबा म्हणाले.



तेवढ्यात पमेला तिथे आली. मुलांनी तिला प्रश्न विचारला.

''अरे मुलांनो, आपल्या कुटुंबाचे प्रमुख आजोबाच आहेत,'' पमेला म्हणाली.

''पण पमेला, ही तर तात्पुरती व्यवस्था आहे. मी तुमच्या आग्रहाखातर इथे राहायला आलो आहे,'' माधवराव म्हणाले.

''मामा, कुटुंबात ज्येष्ठ असलेली आणि अनुभवाने समृद्ध असलेली व्यक्ती मार्गदर्शन करते. मग आपल्या घरात आजोबांशिवाय दुसरे कोण आहे?'' पमेला म्हणाली.

दोन्ही मुले एकाच वेळी म्हणाली, ''हेच आजोबा! दुसरे कोण?''

''मामा, आता कुटुंबप्रमुख कोण, यावर शिक्कामोर्तब झाले ना!'' पमेला हसत म्हणाली.

तेवढ्यात कृष्णकांतही घरी आला.

''आज काय एकत्र गप्पागोष्टी सुरू आहेत?'' त्याने विचारले.

''बाबा, तुम्हीच सांगा, आपल्या कुटुंबाचे प्रमुख कोण?'' मुलांनी विचारले.

''मुळात हा प्रश्नच का निर्माण झाला?'' कृष्णकांतने विचारले.

मुलांनी आजोबांशी झालेला संवाद त्याला सांगितला.

कृष्णकांत क्षणाचाही विलंब न लावता म्हणाला, ''आजोबाच आपल्या कुटुंबाचे प्रमुख आहेत. हा प्रश्नच गैरलागू आहे.''

असे म्हणत त्याने माधवरावांच्या पायांवर डोके ठेवले. पमेलानेही त्यांना वाकून नमस्कार केला.

''आजोबा, मग तुम्ही आम्हाला आईला विचारायला का सांगितले?'' श्रीरामने विचारले.

''कारण, मुलांवर संस्कार करण्यात आईची महत्त्वाची भूमिका असते. आईच्या शब्दांना मान देणेही तितकेच आवश्यक आहे,'' आजोबा म्हणाले.''चला, आता आपण सगळे एकत्र जेवण करूया,'' पमेला म्हणाली.

क्रमशः भाग १७: मना चंदनाचे परी त्वां झिजावे।

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

ज्योतिर्मय दीपावली २०२६ प्रकाशन सोहळा – विद्यार्थी व साहित्यिकांचा सत्कार



ज्योतिर्मय दीपावली २०२६ प्रकाशन सोहळा – विद्यार्थी व साहित्यिकांचा सत्कार














ग्रामगीताप्रणित जीवनमूल्यशिक्षण

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

अध्यात्मिक मार्गाचे वळण लावावे. मुलांची संगत कोणाशी आहे ते शोधावे. यासाठी समाजनेते, शिक्षक, कुटुंबचालक या सर्वांनी यासाठी जागरूकतेने प्रयत्न करून संस्कारक्षम पिढी उद्याच्या देशाचा आधारस्तंभ आहेत व त्यांच्यावर चांगली संस्कार करण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. वं. राष्ट्रसंतांच्या या उपदेशानुसार ग्रामगीता जीवन विकास परीक्षेच्या माध्यमातून संस्कारक्षम पिढ्या घडविण्यासाठी व राष्ट्रसंताचे तत्त्वज्ञान जीवनमूल्य व संस्कार नवीन पिढीमध्ये रुजविण्यासाठी मागील अनेक वर्षापासून गुरुकुंज द्वारा जबाबदारी पार पडल्या जात आहे. ग्रामगीताप्रणीत जीवनमूल्यशिक्षणाच्या माध्यमातून सेवा, समता, सत्यता, आदर्श ग्राम निर्माण, सदाचार, स्वच्छता, धर्म समभाव, शिस्तबद्धता, राष्ट्रीय एकात्मता या विविध उपक्रमाच्या संस्कारासाठी व जीवन विकासासाठी ग्रामगीताप्रणित जीवनमूल्य शिक्षण अतिशय गरजेचे आहे. कारण या ग्रामगीताप्रणित जीवनमूल्य शिक्षणाच्या संस्कारातून सुंदर जीवन जगण्याचे शिक्षण मिळते. म्हणूनच वं. राष्ट्रसंत म्हणतात

याचसाठी शिक्षण घेणे। की जीवन जगता यावे सुंदरपणे। दुबळेपण घेतले आंदणे। त्यासी शिक्षण म्हणू नये।।*(ग्रा.अ.१९ओ.२१)

सर्वश्रेष्ठ असे मानवी जीवन सुसंस्कारीत व सुंदर होण्यासाठी आणि ग्रामगीता प्रणित जीवनमूल्य शिक्षणाच्या माध्यमातून आदर्श नागरिक व थोर महापुरुष राष्ट्र नवनिर्माणासाठी घडविण्यासाठी वं. राष्ट्रसंतांचे वाङ्मय सर्व विकार व दुष्कृत्यावरील वरील दिव्य औषधी असल्याने मृतावस्थेसारख्या अवस्थेतील समाजात जीवंतपणा आणण्याचे सामर्थ्य ग्रामगीता प्रणित जीवनमूल्य शिक्षणात आहे. म्हणूनच अनुभवी अभ्यासकांनी ''ग्रामगीता जीवनमूल्य शिक्षण मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासाची बोधशाळा'' व ''मूल्यशिक्षणाचा, सुसंस्काराचा व आदर्श जीवनाचा मुख्य आधार'' यासारख्या प्रशंसेद्वारे ग्रामगीता प्रणित जीवनमूल्यशिक्षणाची आवश्यकता लक्षात येते. यासाठीच वं. राष्ट्रसंतांनी बालविकासालाच प्राधान्य देताना म्हटले की

बालपणीचे शिक्षण होई। वय झालिया त्रास जाई। वळवित्याही न वळती काही। इंद्रिये त्यांची।।*(ग्रा.अ.१९ओ.३८)

म्हणूनच भावी पिढी संस्कारक्षम होण्यासाठी व भारताचे भविष्य उज्वल होण्यासाठी ग्रामगीताप्रणित जीवनमूल्य शिक्षण अतिशय गरजेचे आहे. म्हणूनच वं. राष्ट्रसंत म्हणतात

आपणास वाटे जैसे गाव व्हावे। तैसेची बालकांना शिकवावे। शहाणे करूनी सोडावे। विद्याशिक्षणे सर्वची।।*(ग्रा.अ.१९ओ.७३)

अशाप्रकारे ग्रामगीता प्रणित जीवनमूल्य शिक्षण खरोखर आत्मोन्नती, समाजोन्नती,ग्रामोन्नत्ती व राष्ट्रोन्नतीची आचारसंहिता आहे. त्याचबरोबर आदर्श जीवनाची गुरुकिल्ली आहे. म्हणूनच ग्रामगीताप्रणीत जीवनमूल्य शिक्षणाची आवश्यकता व गरजेबरोबरच ग्रामगीताप्रणित जीवनमूल्य शिक्षणाचे प्रत्यक्ष कार्य स्वरूप समजून घेणे गरजेचे आहे.

ग्रामगीताप्रणित जीवनमूल्यशिक्षणाचे कार्यस्वरूप

समाजाच्या सर्व स्तरातील व सर्व क्षेत्रातील लहान थोरांना जीवनमूल्य शिक्षणाचे व जीवन विकासाचे व सुसंस्कारी आदर्श जीवनाचे पाठ मिळावे आणि सर्वांचे जीवन सफल होऊन राष्ट्र नवनिर्माण कार्यात त्या सर्वांचा सक्रिय सहभाग मिळावा याबद्दल ग्रामगीता प्रणित जीवनमूल्य शिक्षणावर आधारित ग्रामगीता जीवन विकास परीक्षेची सहा गटात विभागणी करून प्रत्येक परीक्षेसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम पुस्तीकेची निर्मिती, पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यास मंडळ ग्रुप यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आली.

वं. राष्ट्रसंतांच्या समग्र वाङ्मयातून पाठ्यपुस्तकाची व अभ्यासक्रमाची अशा रीतीने चढत्या क्रमाने निर्मिती केलेली आहे की पहिल्या गटापासून तर सहाव्या गटापर्यंत त्या त्या वयोगटाच्या व शैक्षणिक पात्रतेच्या परीक्षार्थींना त्यातून अभ्यास करणे व परीक्षा देणे सुलभ जाईल. याकरीताच ग्रामगीता जीवन विकास परीक्षा विभागाने इयत्ता पाचवी ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश परीक्षा गट पहिला, इयत्ता आठवी ते दहावीसाठी परिचय परीक्षा दुसरा गट, आणि दहावीनंतर सर्वांसाठी प्रवीण परीक्षा तिसरा गट, ग्रामनाथ चौथा गट, ग्रामगीता रत्न पाचवा गट, व ग्रामगीताचार्य सहावा गट अशा सहा गटांमध्ये या परीक्षेचे नियोजन करण्यात येते व प्रवेश तिथी, निकाल व प्रमाणपत्र वितरण याचे ग्रामगीता परीक्षा विभागाद्वारे नियोजित वेळापत्रकानुसार प्रत्येक वर्षी आयोजन करण्यात येते. या परीक्षांच्या प्रत्येक गटातील परीक्षेनुसार विद्यार्थ्यांवर त्याचा वयोगटात योग्य सुसंस्कार व्हावे या दृष्टीने प्रत्येक परीक्षा गटासाठी अभ्यासक्रमाचे योग्य नियोजन करण्यात आले आहे.या अभ्यासक्रमाच्या व परीक्षेच्या माध्यमातून बालक ते सर्व स्तरातील लोकांवर ग्रामगीता प्रणित जीवनमूल्य शिक्षणाचे व जीवन विकासाचे संस्कार करून त्याद्वारे ग्रामोन्नती व राष्ट्रोन्नतीचे दीप उजळावे यासाठी वं. राष्ट्रसंत आवाहन करतात की

अरे! उठा उठा श्रीमंतांनो! अधिकाऱ्यांनो! पंडितांनो! सुशिक्षितांनो! साधूजनांनो! हाक आली क्रांतीची।। गावागावासी जागवा। भेदभाव हा समूळ मिटवा। उजळा ग्रामोन्नतीचा दिवा। तुकड्या म्हणे।।

अशाप्रकारे ग्रामगीता प्रणित जीवनमूल्य शिक्षणावर आधारित ग्रामगीता जीवन विकास परीक्षेतील प्रत्येक गटात सहभागी होणा–या परीक्षार्थ्यांवर जीवनमूल्य शिक्षणाचे सुसंस्कार घडतात. ज्याप्रमाणे भागवत धर्माच्या प्रसारासाठी ''ज्ञानदेवे रचिला पाया। तुका झालासे कळस।। त्याचप्रमाणे वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीता व समग्र साहित्यात जीवन विकासासाठी सांगितलेली जीवनमूल्ये व संस्कार सर्व स्तरातील व क्षेत्रातील जनतेने अंगीकारावी यासाठी ''प्रवेश परीक्षा हा पाया असून ग्रामगीताचार्य परीक्षा जणू कळस'' असे परीक्षेचे स्वरूप व रचना असून ह्या ग्रामगीता जीवन विकास परीक्षा आजच्या काळाची अत्यंत निकडीची गरज आहे व त्याचे ग्रामगीताप्रणित जीवन मूल्य शिक्षणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे योगदान असून जीवनविकासाच्या दृष्टीने ते महत्वपूर्ण आहे.

ग्रामगीताप्रणित जीवनमूल्यशिक्षणाचे महत्व

मानवतेचे महान पुजारी, ग्रामगीतेचे जनक, सहस्त्रपैलू व्यक्तिमत्त्वाचे धनी, क्रांतदर्शी, विश्वयोगी युगप्रवर्तक वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे तत्त्वज्ञान, अवतार कार्य, समग्र वाङःमय, तसेच त्यांनी स्थापन केलेल्या अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज आश्रमच्या कार्यप्रणाली व तत्वप्रणालीच्या अभ्यासातून समाजाच्या सर्व स्तरातील सर्व क्षेत्रातील लहान थोरांना जीवनमूल्य शिक्षणाचे, सुसंस्काराचे व आदर्श जीवनाचे पाठ मिळावे आणि सर्वांचे जीवन सफल होऊन राष्ट्रोन्नतीच्या कार्यात त्या सर्वांचा सक्रिय सहभाग मिळावा या उदात्त हेतूने प्रेरित होऊन ग्रामगीताप्रणीत जीवनमूल्य शिक्षणावर आधारित ग्रामगीता जीवन विकास परीक्षा विभाग अत्यंत मोलाचे कार्य करीत असून ती आजच्या काळाची गरज आहे.

वर्तमान युगात विज्ञानाने आश्चर्यकारक अशी प्रगती मानवी जीवनात झाली तरी मानवाचे जीवन व त्यांचे व्यक्तिमत्व संपूर्णता विकसित व समृद्ध झाल्याचे दिसत नाही. तसेच अनेक समस्या आजही आ वासून उभ्या आहेत. अशा वेळी जीवन विकास म्हणजे नक्की काय? तो मी कसा करायचा? माझा उध्दार मी स्वतः कसा करायचा? याच्यासाठी आपले जहाज नेहमीच भरकटत असते. तेव्हा मात्र महान संत व त्यांचे ग्रंथ, साहित्य दीपस्तंभ होऊन आपले जहाज अगदी अलगद किनाऱ्याला आणून सोडत असतात. नेमके हेच महान कार्य दीपस्तंभ होऊन ग्रामगीताप्रणित जीवनमूल्य शिक्षणाद्वारे घडत आहे.

मनुष्य हा पृथ्वीतलावर एकमेव प्राणी आहे की ज्याला बुद्धी आहे. इतर जीवांनाही काही प्रमाणात बुद्धी आहे परंतु ती बुद्धी स्वतःचे जीवन विकास घडवून आणण्यासाठी नसून स्वतःचे पोट कसे भरता येईल यासाठीच. परंतु माणूस हाच एकमेव प्राणी ज्याला बुद्धी दिली असून त्याच्या आधारे आपल्या जीवनाचा विकास साधायचा असतो. हाच विकास साधण्यासाठी वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीता ग्रंथात जन्म संस्कार ते मृत्यूसंस्कार अशा संपूर्ण जीवन विकासाची मूल्ये व संस्कार सांगितले आहेत. तसेच वं. राष्ट्रसंताचे इतरही समग्र साहित्य संपूर्ण व्यक्तिमत्व विकासासाठी एक प्रेरणास्त्रोत व मार्गदर्शक आहेत.

मानवाच्या बौद्धिक प्रगल्भतेतून भौतिक प्रगती होत असते. ही प्रगती कल्याणकारी होण्यासाठी परिपक्व उच्च मानसिकतेची गरज असते. अशी मानसिकता संस्कार जीवन प्रणालीतून विकसित होते. बालकाच्या कोवळ्या निष्पाप मनावर माणुसकी, सर्वसमानता, न्यायप्रियता, बंधुत्व, सदाचार, नैतिकता, श्रद्धा,आस्था, जीवनमूल्ये यांचे संस्कार





झाले तर मनोबल दृढ होते. विवेक पक्का होतो. म्हणून वं. राष्ट्रसंत उपदेश करतात

गावाचे सर्वात मुख्य पुत्रधन। त्यांचे संरक्षावे चरित्रधन। तेणे गावाचे वाढेल महिमान। चारित्र्यापरी उज्वल।।(ग्रा.अ.१९ओ.३६)

असे चारित्र्यसंपन्न बालक घडण्यासाठी त्यांना योग्य संस्कारक्षम शिक्षणाचे धडे देणे गरजेचे आहे असे राष्ट्रसंत सांगतात

आपणासी वाटे जैसे गाव व्हावे। तैसेची बालकांना शिकवावे। शहाणे करोनि सोडावे। विद्या शिक्षणे सर्वची।।(ग्रा.अ.१९ओ.३७)

कारण पूज्य श्री साने गुरुजींच्या मते ''मुलं म्हणजे देवाघरची फुलं. ते पवित्र आहेत आणि पवित्र राहिले पाहिजेत. त्यांना गरीब श्रीमंतीच्या वादाची झळ, पंत– पक्षांचा वारा अनितीची जळमट नाही लागू देता कामा.'' तरच इथं देवाचं राज्य येईल. देशाचा उज्वल भविष्यकाळ त्यांच्या रूपानेच साकार होईल.

अशा निष्पाप बाल्यावस्थेला योग्य वळण लावण्यासाठी आई–वडील, शिक्षक, ज्येष्ठ मंडळी या सर्वांचे संस्कारक्षम योगदान महत्त्वाचे आहे. कारण मानव हा जन्मताच संस्कारी किंवा ज्ञानी नसतो. परंतु बालवयात रूजलेले चांगले संस्कार आयुष्यभराची संपत्ती असते. तसेच मुले ही माता पित्यांचे सर्वस्व तर असतेच त्याचबरोबर ते राष्ट्राची संपत्ती आणि समाजाचा अमूल्य ठेवा असतो. म्हणूनच वं. राष्ट्रसंत म्हणतात

जन्म देण्याचे काम माता–पित्याचे। शिक्षणाचे काम विद्यागुरुचे। ते आसक्तीने पुत्र धन देशाचे। बिघडवू नये लाडवोनी।।(ग्रा.अ.१९ओ.४५)

यासाठी संस्कारक्षम शिक्षणाच्या माध्यमातून बालकांच्या सर्वांगीण गुणांचा विकास व्हावा जेणेकरून वर्तमान स्पर्धात्मक युगात यशस्वी होतील. आपला परिवार, समाज, ग्राम आणि राष्ट्र व मानवतेच्या संदर्भात आपल्या जबाबदा–या सांभाळून आदर्श नागरिक म्हणून स्वयंपूर्ण व उद्दिष्टपूर्ण जीवन ते जगू शकतील. यासाठी वं. राष्ट्रसंत उपदेश करताना म्हणतात

आजचे सान सान बाल। उद्या तरुण कार्यकर्ते होतील। गावाचा पांग फेडतील। उत्तमोत्तम गुणांनी।।

म्हणूनी म्हणतो बालधन। ठेवा गावकऱ्यांनो! जपून। कोण सांगेल निघतील रत्न। किती गावी।।(ग्रा.अ.१९ओ.७३।७४)

वं. राष्ट्रसंतांच्या ह्याच उद्देशाकरिता ग्रामगीताप्रणित जीवनमूल्य शिक्षणाचे विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करून त्यांना आदर्श नागरिक कसे घडविता येईल याचे मार्गदर्शन ग्रामगीता जीवनविकास परीक्षांच्या अभ्यासक्रमातून होत आहे. म्हणूनच वं. राष्ट्रसंत म्हणतात

आदर्श होतील विद्यार्थी गण। गावाचे पालटेल जीवन। कोठेच न उरेल गावंढळपण। टिकाऊ परिवर्तन या मार्गे।।

विद्यामोले ऐसे चढता। येईल भाग्य गावाचे हाता। तुकड्यादास म्हणे तत्वता। विसरू नका हा मूळ मंत्र।।(ग्रा.अ.१९ओ.१०८।१०९)

अशाप्रकारे सुसंस्कारित पिढी घडावी ही वं. राष्ट्रसंत यांची आर्त तळमळ होती. आणि तेवढ्याच तळमळीने ग्रामगीताप्रणित जीवनमूल्य शिक्षणावर आधारित ग्रामगीता जीवनविकास परीक्षेच्या माध्यमातून सर्व क्षेत्रातील लोकांसाठी संस्काराची एक चळवळ उभी करून समाजोन्नती व राष्ट्रोन्नतीचे कार्य हजारो विद्यालये व लाखो विद्यार्थ्यांमार्फत घडत आहे. कारण *संस्कार केले तर संस्कृती टिकेल संस्कृती टिकली तर धर्म टिकेल आणि धर्म टिकला तरच राष्ट्र टिकेल*

असे संस्कारक्षम जीवन विकसित होण्यासाठी आजची शिक्षणप्रणाली परिपूर्ण नाही. यासाठी ग्रामगीताप्रणित जीवनमूल्य शिक्षणाची गरज आहे. कारण वं. राष्ट्रसंताचे वाङःमय म्हणजे सुसंस्कारित जीवनमूल्य शिक्षणाचा खजिनाच आहे. जेवढे ज्ञानाचे मोती त्यातून आपण वेचू तेवढे कमीच आहे. अशा या ज्ञान संस्कारातून राष्ट्रोन्नती साधण्यासाठी ग्रामोन्नतीची गरज आहे. म्हणून वं. राष्ट्रसंत म्हणतात

गाव विश्वाचा नकाशा। गावावरून देशाची परीक्षा। गावची भंगता अवदशा।येईल देशा।।(ग्रा.अ.१ओ.४९)

देशाची अवदशा टाळण्यासाठी व गावाची दशा व दिशा बदलण्यासाठी ग्रामगीताप्रणित जीवनमूल्य शिक्षणाचे संस्कार ही काळाची गरज आहे. यासाठी गावाचा पाया असलेला माणूस सुसंस्कारीत व्हावा व त्याचा जीवन विकास व्हावा असे वं. राष्ट्रसंत उपदेश करतात

विश्वाचा घटक देश। गाव हाची देशाचा अंश। गावाचा मूळ पाया माणूस। त्यासि करावे धार्मिक।।(ग्रा.अ.२ओ.२२)

मित्रहो! गाव व्हावे स्वयंपूर्ण। सर्व प्रकारे आदर्शवान। म्हणोणीच घेतले आशीर्वचन। पूर्वजांचे।।(ग्रा.अ.१ओ.१००)

वं. राष्ट्रसंताच्या या संस्कारानुसार मनुष्याचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय आत्मोन्नती,समाजोन्नती,ग्रामोन्नती व राष्ट्रोन्नती शक्य नाही. म्हणूनच वं. राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेच्या ४१ अध्यायात व आठ पंचकात मनुष्य जन्मापासून जीवनाच्या प्रत्येक अवस्थेपासून ते मृत्यूपर्यंत सर्वांगीण संस्काराचे मार्गदर्शन केले आहे. तसेच वं. राष्ट्रसंतांचे समग्र वाङःमय आदर्शमय जीवन घडण्यासाठी एक प्रेरणास्त्रोत आहे. वं. राष्ट्रसंत यासाठी प्रेरणा देतात की

ग्रामगीता ग्रंथ सुंदर। निर्मावया गावाचे चारित्र्य। प्रचार करावा सर्वत्र। होऊनि पवित्र आपणही।।(ग्रा.अ.४१ओ.१२६)

वं. राष्ट्रसंतांचे हे प्रेरणादायी ग्रामगीतारूपी महामंगल संस्कार स्तोत्र एक दीपस्तंभ आहे. या ग्रंथाद्वारे आदर्श जीवन जगण्याकरता व आदर्श ग्राम निर्मितीसाठी वं. राष्ट्रसंतांनी ग्राम जनता जनार्दनाला प्रेरित केले आहे. हा ग्रंथ वाचवायचा नाही तर जगवायचा ग्रंथ आहे. मानवाचे जगणे सुंदर व समृद्ध करण्याकरता वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे प्रेरणादायी कार्य सदैव वंदनीय असे आहे.

वं. राष्ट्रसंतांच्या मते आदर्श संस्काराने सदुण संवर्धन व दुर्गुण निर्मूलन होऊन नराचा नारायण होऊ शकतो म्हणूनच वं. राष्ट्रसंत म्हणतात

मानव पशुयोनीतूनी आला। नराचा नारायण होणे त्याला। यासाठी संस्कार देऊनी सावरिला। क्रमाक्रमाने।।(ग्रा.अ.२ओ.२८)

या उपदेशानुसार संस्काराने मनुष्याला सावरणे ही काळाची गरज आहे. कारण आज प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा असून शैक्षणिक क्षेत्र पदव्या देणारे कारखाने बनले असून तिथे त्यांच्यावर समाजनिष्ठेचे संस्कार कोण करणार? तसेच सभोवताली समाजात असलेले धार्मिक, सामाजिक वाद या घटनांमुळे भरकटणा–या युवा पिढीचा जीवन विकास कसा घडेल? अशावेळी गुरुजन, शिक्षक, प्राध्यापक या सर्वांकडे संस्कारक्षम पीढी घडवण्याची जबाबदारी आहे आणि अनेक गुरुजन, प्रचारक ग्रामगीता प्रणित जीवनमूल्य शिक्षणावर आधारित ग्रामगीता जीवन विकास परीक्षाद्वारे ही जबाबदारी पार पाडत आहेत. म्हणूनच वं. राष्ट्रसंत उपदेश करतात

गुरुजनी ऐसे द्यावे धडे। आपुला आदर्श ठेवूनी पुढे। विद्यार्थी तयार होता चहूकडे। राष्ट्र होईल तेजस्वी।।(ग्रा.अ.२ओ.८७)

या उद्देशासाठीच ग्रामगीता प्रणित जीवनमूल्य शिक्षणाद्वारे मानवी जीवन सत्यम शिवम सुंदरम बनविणे हीच वर्तमान काळाची गरज आहे. म्हणून वं. राष्ट्रसंत उपदेश करतात

संस्कार आणि शुद्धबुद्धता। आरोग्य आणि पवित्रता। यावरी लक्ष ठेवूनि सात्विकता। बिंबवावी जीवनी।।(ग्रा.अ.१५ओ.९३)

असे संस्कारक्षम व सात्विक जीवन घडविणे हे सुद्धा एक आव्हानात्मक कार्य आहे. कारण विज्ञान तंत्रज्ञानाचे युगात सर्वांगीण शिक्षण, संगणकीकरण, स्त्रियांचा अंतरिक्ष पासून सर्व क्षेत्रात झालेला प्रवेश या निश्चितच अभिमानाच्या गोष्टी आहेत. प्रसारमाध्यमांद्वारे देश परदेशही जवळ आले आहेत. परंतु समाजाचा आर्थिक स्त्रोत उंचावण्याबरोबर समाजात भ्रष्टाचार,विलासीवृत्ती,चंगळवाद, बोकाळला आहे. देशांतर्गत अनेक प्रश्न व समस्या असून त्यासंदर्भात समाजामध्ये एक सामाजिक असंतुलन निर्माण झालेले आहे. त्याचप्रमाणे पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे निसर्गाचेही संतुलन बिघडले आहे. या साऱ्या गोष्टींचा परिणाम बालक व युवा पिढीच्या विचारांवर नकळत होत आहे. परंतु अशा विपरीत परिस्थितीतही सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वं. राष्ट्रसंतांच्या जीवनमूल्यांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी ग्रामगीताप्रणित जीवनमूल्य शिक्षण एक दीपस्तंभ असून अनेक आव्हानांना तोंड देण्याची क्षमता यामध्ये असून नवीन पिढ्यांना आदर्शवादी बनविण्याची प्रेरणा यामधून प्राप्त होते. तसेच वं. राष्ट्रसंतांच्या विचार प्रचारासाठी ग्रामगीताप्रणित जीवनमूल्यशिक्षण व राष्ट्रसंतांच्या समग्र वाङःमय यावर आधारित विविध विषयावर वक्तृत्व स्पर्धा, शाळांमधून प्रश्नमंजूषा स्पर्धा, जिल्हा–तालुका– विदर्भ– राज्यस्तरावर सामान्यज्ञान स्पर्धा, निबंध स्पर्धा, भजन स्पर्धा, ओव्या श्लोक पाठांतर स्पर्धा, किंवा लेखन स्पर्धा, यासारख्या सर्व उपक्रमासोबतच संस्कार शिबिरे, श्रमदान शिबिर, ग्राम स्वच्छता अभियान, जल व्यवस्थापन, वृक्ष संगोपन, पर्यावरण संरक्षण अभियान असे सामाजिक उपक्रम ग्रामगीताप्रणीत जीवनमूल्य शिक्षणाद्वारे श्री गुरुदेव सेवा मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली राबविणे ही आजच्या काळाची गरज आहे. तेव्हाच वं. राष्ट्रसंतांचे समग्र साहित्य व ग्रामगीता यात सांगितलेली जीवनमूल्ये व संस्कार यांचा प्रचार व प्रसार होऊन आत्मोन्नती, समाजोन्नती,ग्रामोन्नती व राष्ट्रोन्नती होईल.याच उद्देशाने वं. राष्ट्रसंत आव्हान करतात

ग्रामगीता नव्हे पारायणासी। वाचता वाट दावी जणासी। समुळ बदली जीवनासि। मनी घेता अर्थ तिचा।।(ग्रा.अ.४१ओ.६६)

म्हणून वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीताप्रणित जीवनमूल्य शिक्षणाद्वारे ''मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास'' हा उद्देश या शिक्षणाच्या व ग्रामगीता जीवनविकास परीक्षेच्या माध्यमातून पूर्ण व्हावा आणि त्याकरिता श्री गुरुदेवांनी सर्वांना प्रेरणा द्यावी अशी श्री गुरुदेव चरणी नम्र प्रार्थना व कोटी कोटी प्रणाम!

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559